जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.११/०९/२०२३
## दि.१०/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ४७२/२०२३,भादविक ३०२,५०४ |
| **फिर्यादी** | स्वप्निल खांदवे,वय-३०,रा.वाघोली रोड लोहगाव पुणे |
| **आरोपीत** | आशिष सुनिल भोसले,वय-३२ रा.७४/१,संतनगर,वाघोली रोड,लोहगाव,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०९/२०२३ रोजी २१/०७ वा. ७४/१,गणपती मंदिरा जवळ,संतनगर,वाघोली रोड लोहगाव पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याची पत्नी हिचे चारित्र्यावर संशय घेवुन,तीचेसोबत सतत भांडणे काढुन व शिवीगाळ करुन,घरातील चाकुने तीचे गळयावर,मानेवर तसेच पोटावर वार करुन,तीस गंभीर जखमी करून,तीचा खुन केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. धामणे ९५०३२४६५५५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ५४०/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय-२२,रा.पाषाण,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०९/२०२३ रोजी १४/३० वा. पाषाण टेकडीवर सुस रोड,पाषाण,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे मैत्रीणीसह पाषाण टेकडीवर पायी फिरण्याकरीता गेले असताना, नमुद इसमांनी त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन ५०,०००/- रु किंची जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पाटील ९०११७१९१०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १३५३/२०२३,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | सौ.वर्षा गडदे,वय-२९,रा.शेवाळवाडी,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | ठेकेदार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०८/२०२३ रोजी १३/०० वा.मांजराई व्हिलेज,मांजरी रेल्वे गेटचे शेजारी,मांजरी-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम ठेकेदाराने त्याचे मांजराई व्हिलेज,मांजरी रेल्वे गेटचे शेजारी,मांजरी-बुद्रुक,पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवर मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे, यातील कामगार फिर्यादी यांचे पती विठ्ठल गडदे,वय-२९, रा.शेवाळ |

वाडी,हडपसर,पुणे हे इमारतीचे बिंल्डीगचे तिस-या व चौथ्या माळयावर काम करीत असताना, सदर ठेकेदार याने माळयावर बांधकामासाठी ठेवलेल्या सळया व सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती काळजी न घेतल्याने,तसेच विठ्ठल गडदे यांचे डोक्यात हेल्मेट न दिल्याने त्यातील एक लोखंडी सळई विठ्ठल गडदे यांच्या डोक्यात पडुन,त्यामध्ये गंभीर जखमी होवुन, त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. गोरे ८९७५२४५१००

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**